# लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) परीक्षा-२०१५
# घोषणा

आयोगातर्फे दि. 11 ऑक्टोबर, 2015 रोजी लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) परीक्षा 2015 घेण्यात आली आहे. सदर परीक्षेतून पात्र उमेदवारांची शिफारस होण्याच्या दृष्टीने प्रमाणपत्र तपासणीसाठी 3135 उमेदवारांची यादी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे. प्रमाणपत्र तपासण्यासाठी बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांनी प्रस्तुत पदाच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अटी व तरतूदींची पूर्तता करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र तपासणीचा कार्यक्रम लवकरच आयोगाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल. तद्नंतर सदर उमेदवारांनी नेमून दिलेल्या ठिकाणी व वेळेवर मूळ प्रमाणपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतींसह कृपया उपस्थित रहावे.

2. अर्जात अमागास (महिला) वर्गवारीसाठी आरक्षित पदासाठी दावा केलेल्या तसेच अर्जात विजा(अ), भज(ब), विमाप्र, भज(क), भज(ड) व इमाव वर्गवारीचा दावा केला असल्यास अशा उमेदवारांनी आयोगातर्फे जाहिरात ज्या वित्तीय वर्षात (एप्रिल ते मार्च) दिलेली असेल त्या पूर्वीच्या वित्तीय वर्षापासूनचे क्रिमीलेअरमध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले नॉन क्रिमीलेअर (NCL) प्रमाणपत्र, तपासणीच्यावेळी सोबत आणावे.

3. ज्या उमेदवारांनी अर्जात खेळाडू वर्गवारीचा दावा केलेला आहे, अशा उमेदवारांनी त्यांची खेळाडूबाबतची प्रमाणपत्रे **'संचालक, क्रिडा व युवक संचालनालय'** यांच्याकडून प्रमाणित करुन घेऊन प्रमाणपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : 17 फेब्रुवारी, 2016

**सु. सं. केसरकर**
**उपसचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**